
# शब्दांमृत®


भाग-२

विलास जैन



हे कार्य नाही क्रांती आहे

NEW ERA'S SELF HELP



# समर्पन

हा शब्दांमृत काव्यसंग्रह

सर्मपीत आहे,

निसर्गाच्या त्या रक्षकांसाठी

जे ह्या धरतीला

त्यांची संपत्ती नाही,

तर त्यांच्या भावी पिढीची

ठेव मानतात.

आपणा पासून मला प्रेरणा मिळते

**विलास जैन**

हे कार्य नाही क्रांती आहे

## अल्प परिचय....

### विलास जैन

विलासभाऊ जैन यांचा जन्म एका छोट्याश्या खेड्यात झाला. खेडे गावात शिक्षणाची सोय नसल्यामुळे त्यांना छोट्या वयातच गाव सोडून शहरात शिक्षणासाठी जावे लागले. त्यांना कोणाचेही मार्गदर्शन नसतांना त्यांनी शिक्षणाचे माहेरघर पुणे येथून एका नामवंत संस्थेतून १९८८ साली एम्.बी.ए. (मार्केटींग) या विषयात शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर स्वत:चा चिपकविण्याचे पदार्थ विकण्याचा एक आगळा वेगळा व्यवसाय सुरु केला. सुरुवातीला फक्त विक्रीचा व्यवसाय केला व त्यानंतर त्या वस्तू स्वत: बनविण्याचा कारखाना टाकला. त्यांचे अभ्यासू व्यक्तिमत्व असून आज ते एक दूरदर्शी प्रगतशील उद्योजक आहेत. त्यांनी चिपकविण्याच्या विषयात चार शोध लावलेत व अनेक उत्पादने स्वत: तयार केलीत. आज ते एक सफल उद्योजक, संशोधक, शेतकरी, समाजकारणी व राजकारणी तर आहेत; पण एक उत्कृष्ट साहित्यिक देखील आहेत. त्यांचे लिखाण हिंदी व मराठी भाषेत असून संपूर्ण लिखाण समाजपयोगी, सुसंस्कार घडविणारे, प्रेरणा देणारे, अध्यात्मिकतेचा आधार असलेले व नैतिक मूल्य मनावर बिंबवणारे आहेत. त्यांनी हिंदी व मराठी दोन्ही भाषेमध्ये बालकविता, प्रेरणा कविता, देशभक्तीपर कविता, विडंबन कविता, कव्वाली, दोहे, प्रेरणा शायरी, सुविचार, सिनेगित, उखाणे, भजन, आध्यात्मिक कविता, ग्रह ताऱ्यांवरील कविता, समाज रचनेवरील कविता, छोट्या शिक्षाप्रद गोष्टी आणि मराठी गझल लिहलेल्या आहेत. त्यांची एकूण दहा पुस्तके प्रकाशित व दोन प्रकाशनाच्या मार्गावर आहे. त्यांची सामाजिक, राजकीय व अध्यात्मिक विषयाची दीर्घ वाटचाल त्याबरोबर खेड्यात तसेच शहरातील वातावरणात घालवलेली वर्षे त्यांना आपल्या लिखाणात फार महत्त्वाचे ठरलेली आहेत. निसर्गाशी जिवापाड प्रेम असल्यामुळे त्यांनी हजारो वृक्ष लावलेली आहेत आणि लिखाणापासून मिळणारा सर्व पैसा निसर्ग संर्वधना करीता वापरण्याचा प्रण त्यांनी केलेला आहे.

# शब्दांमृत®

**भाग-२**

प्रकाशन : प्रथम

प्रकाशक : विलास जैन

लेखक : विलास जैन

प्रति :

अक्षरांकन : विलास जैन

निर्मित : विलास जैन

मुद्रक :

© All Right Reserved 2020

New Era Self Help Marketing India Ltd. is registered in India under Public Ltd. Company Act 1956 Reg. No. U51909 MH2002 PLC 138100

सर्वाधिकार :

या कविता संग्रहातील सर्व भाग, चित्र, लिखाण पूर्व परवानगीशिवाय पुनर्मुद्रित केले जाणार नाहीत. या प्रकाशनाबाबत अनधिकृत काही प्रकाशन आढळल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थेवर कायदेशीर कारवाई केली जाईल.

# प्रस्तावना

जीवनात संघर्ष करते वेळी अनेक कविता, काही शब्दसमूह व सुविचार, आपली लढण्याची शक्ती वाढवितात. हारत असलेली आपली बाजू जिंकण्यात, आपला आत्मविश्वास, वाढविण्यास असे साहित्य आपली मदत करतात. जीवनातल्या अनेक वळणावर ते आपल्याला चांगले मार्ग दाखवितात आणि आपल्याला जीवन जगण्याची प्रेरणा देतात. मला माझ्या जीवनात चांगल्या मार्गावर चालण्या करीता, विचलित न होण्याकरीता असे अनेक साहित्य मार्गदर्शक महत्वाचे ठरले आहेत. त्यापासूनच प्रेरणा घेऊन मी विचार केला की, मी पण काही असे स्वअनुभवावर आधारीत शब्दसमूह तयार करावे जे जखमेवर मलम, टॉनिक व मार्गदर्शकाचे काम करतील. जे कुणी विचलीत होऊन चुकीच्या मार्गावर गेलेले आहेत त्यांना असे साहित्य चांगल्या मार्गावर आणण्यास मदत करतील. आज जर आम्ही बघितले तर आजच्या सांस्कृतिक प्रदूषणाच्या जीवनात या सर्व वस्तुंचे महत्व पहिल्या पेक्षा जास्त महत्वाचे आहे. कारण आता तुम्हाला मार्गावरुन भटकविण्यासाठी घरातच टि.व्ही. हे माध्यम आहे. ई-मेल, सोशलाईजींग मिडिया व एस.एम.एस. व्दारे आता सहजपणे कुणालाही काही न कळू देता भरपूर असामाजिक गोष्टी करता येऊ शकतात. पूर्वी प्रत्येकाचे जीवन हे संस्कार, नीतिमूल्ये, आदर, लाज व त्याग यांच्या धाग्यात बांधलेले असायचे. पण आता या आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स् मिडियाच्या आगमनाने या सर्व गोष्टींची बंधने तुटलेली आहेत. आता आपल्याला काय खायचे?, काय प्यायचे?, कसं दिसायचं?, कसं वागायचं?, काय विकत घ्यायचं? हे सर्व इलेक्ट्रॉनिक्स् मिडिया आपल्याला शिकवीत आहे. इतकचं नाही तर आपले नाते-संबंध कशी असावित हे सुद्धा अनेक मालिकांद्वारे आपल्या सुप्त मनात बसविण्याचे काम सुरु आहे. मला आशा आहे की, या पुस्तकातील काही सुविचार, कविता आपल्याला विचलित होण्यापासून थांबवितील व जिवनात काही गोष्टीकडे बघण्याचा आपला दृष्टीकोन बदलवतील. जर का तुम्ही जीवनात हारलेले असाल, विखुरलेले असाल तर यातील काही कविता तुमच्यासाठी संजीवनीचे काम करु शकतात आणि तुम्हाला यापासून काही लाभ झाला तरच मला असे वाटेल की, माझे लिखाण सार्थक ठरले.

आपला विनम्र

विलास जैन

हे कार्य नाही क्रांती आहे

# शब्दांमृत® भाग-२

SELF HELP

## अनुक्रमणिका


१) फुल ०१
२) जीवनदान ०२
३) व्यापारी ०३
४) आरसा ०४
५) पाऊस तु का विसरलास ०५
६) लोकशाही ०६
७) संविधान ०७
८) ज्वारी ०८
९) कपाशी ०९
१०) विधवा १०
११) विधुर ११
१२) म्हातारपण १२
१३) हरवली आहे १३
१४) उत्सव १४
१५) होळी १५
१६) गरज नसते १६
१७) गरज असते १७
१८) शेतकरी १८
१९) प्रतीस्पर्धा १९
२०) निरागस जीवन २०
२१) किव २१
२२) अपघात २२
२३) अपराध २३
२४) प्रेमाचे बिज २४
२५) सल्ला २५
२६) न्याय २६
२७) वेडा २७
२८) शरीर २८
२९) अंधार २९
३०) विडंबना ३०
३१) आक्रोश ३१
३२) चालणारे नाणे ३२
३३) श्रध्दा-अंधश्रध्दा ३३
३४) डर ३४
३५) स्वातंत्र ३५
३६) वणवा ३६
३७) राजयोग ३७


हे कार्य नाही क्रांती आहे



# फुल

भावना व्यक्त करण्याचे
सशक्त साधन बनलो मी
विविध भावनांचा खेळ खेळतांना
सर्वस्व अर्पुन मिटलो मी

कधी प्रियकराचा संदेश
वाहक बनलो मी
तर कधी प्रियतमेच्या गालावर
फिरुन ओठावर फुललो मी

कधी सुहागरातची सेज सजवून
प्रथम प्रेमाचा साक्षी बनलो मी
तर कधी अर्थिवर सजत
शेवटचा सोबती झालो मी

कधी विजयश्री मिळवणाऱ्या
विजेत्याजवळ जावून गर्वाने फुगलो मी
तर कधी आजाराशी लढणाऱ्या
रुग्णासोबत हारलो मी

कधी केसात गजरा बनुन
पवित्र प्रेमाचे प्रतिक बनलो मी
तर कधी वासनाच्या आवेशात
मनसोक्त चिरडलो गेलो मी

कधी मंदिरात देवाला पुजण्या
वापरलो गेलो मी
तर कधी गुलदस्त्यात सजून
कोपऱ्यात बसुन कोमेजलो मी

जरी सुकलो तरी औषध बनुन
सौदर्य वाढविण्याचे साधन बनलो मी
जरी तुटलो तरी आपली भव्यता व
सुंदरता ना विसरलो मी

जिथेही गेलो निर्मळ, निरागस प्रेमाचे
प्रतिक म्हणून फुललो मी
निरनिराळ्या भावनांच्या खेळात
सुहास पसरवणे न भुललो मी

विलास जैन

# जीवनदान

माह्या शेतामंधली बोर
जशी आजकालची लबाड पोर,
बाहेरुन गोड रसदार
आतून आठोई कणखर

माह्या शेतामंधली चिंच फोड
सांगे संसाराची चव ही आंबट गोड,
बाहेरुन दिसे माती वानी
मधून लाल रसदार
तोंडाला सोडे पानी

माह्या शेतामंधले पेरू
सांगे जास्त पाप नाही करू
कव्हा नरम कव्हा कडक
आहे जीवनामध्ये
सर्व सुख, दुखाची झलक

माह्या शेतामंधले कवीट
सांगे परतेक दिवसावर रात्रीचे सावट
वाटे चंद्रा वानी गोल
मंधी तुरट तुरट
म्हणे घाम तू गाय
अन् दिवस पालट

माह्या शेतामंधले लिंबू
सांगे नाही राहु कोणावर विसंबू
किमया गह्यरी ह्या फयात आंबट रसाळ
बांधा दारावर देई भूत पलीत पयाळ

माह्या शेतामंधी दडल
अवघ तत्वज्ञान,
फळा फुलांनी झाडा झुडपांनी
दिले माणसाले जीवनदान

विलास जैन

# व्यापारी

कवी ह्रदयाचा मी व्यापारी छान
सप्तरंगी भावनांची सजवली दुकान

काम क्रोधाचा काढला केर कचरा
घान
सदगुणांची धुपबत्ती पेटवली छान

घामाचा हा सडा टाकला
त्यावर स्वप्नांची रांगोळी काढली छान

पाप पुण्याचा चोख हिशोब ठेवला
परम्यात्माचा आवाज मी ऐकला

अनुभवाचे हे वजन काटे
तोले, खोटा काढे खरा टाके

साफ स्वच्छ वस्तुंचा करी संग्रह
घ्या फक्त चांगल्या गोष्टी धरी आग्रह

धान्यांतुन निवळे कचरा काडी
अष्ट कर्माची बांधे निटनेटकी पुडी

भक्तीचा मी गोळा केला गल्ला
राग संताप मी गिळून खाल्ला

मनोभावे निरंतर देई सेवा
मि जोपासला विश्वासाचा ठेवा

विलास जैन



# आरसा

आरशातले प्रतीबिंब माझे
मलाच ओळखू येईना
जायचे होते कोठे
कुठे पोहोचलो उमजेना

ओळख माझी मलाच
कळली नव्हती
हल कल्लोळ हा कोणता
होता माझ्या अवती भोवती

निवांत वेळी जेव्हा निहारला
मीच माझा चेहरा
भय, चिंता, क्रोध, उत्सुकतेचे जाळे
खिळल्या चेहऱ्यावर नजरा

प्रयत्न करुन ठेवत होता
मी माझा चेहरा हसरा
हावी होत होत्या त्याच्यावर
जीवनातल्या काट कसरा

आरशातला तो मीच आहे
हे पचवले जाईना
सुंदर सुखद स्वप्न पाहिलेले
विसरले जाईना

एके काळी पाहिलेले सुंदर
स्वप्न लपले होते काळजात
शोधत होतो स्वप्नातील मी
मलाच फिरुन फिरुन आरशात

विलास जैन



# पाऊस तू का विसरलास

पाऊस तू आलास
आमच्याकडे यायचे विसरलास

बघ कशी ही धरणी तापली
छातीवर हिच्या पिके वाकली

पाण्याची ती विहीर सुकली
पाणी वाहून आई बहिणींची मान वाकली

गुरा ढोरांनी मान टाकली
अशी कशी रे तुझी मर्जी फाकली

पापाची सजा ही कसल्या
आई बहिणी विना रोजगार बसल्या

भाजी पाल्याचे मळे नासले
डोळे आता तुझी वाट पाहत बसले

पड आता सड सड
पोटात उठते आहे कड

हातात राहिले नाही बळ
शरीरात उरले फक्त हाड

जर नाही बरसला काही काळ
तुटेल माणसाची धरतीशी नाळ

किती दिवस झाले आले नाही नळ
जीवन झालय बघ तमाशाचे फड

वाट पाहतात तुझी बाळ - गोपाळ
चल पड आता पड

विलास जैन



# लोकशाही

बादशाही (मोघलाई) गेली बघा
आली आता लोकशाही,
अर्थ लावावा ज्यांनी जसा
कुणाला काही अडचण नाही

लोकशाहीच्या या गव्हाऱ्याची
गुराखी बनली नोकरशाही,
कोणी दाखवतो कायदा
कोणी चढवतो आपली बाही

न्याय देण्याघेण्याची येथे
कुणाला नाही काही घाई,
न्यायालयात चकरा मारता
येथे जीव कित्येकाचा जाई

गुंड आणि अप्रवृत्ती निवडली
सुरक्षित राखण्या लोकशाही
या देशाचे काहीही होवो
जिवंत रहावी आमची लोकशाही

विलास जैन



# संविधान

भेटला होता मला
एकदा भारताचा संविधान,
शोधत होता तो
लोकशाही टिकविण्याचे निदान

पांघरलेले होते त्याने
न्याय आणि सुरक्षेचे ॲप्रोन
म्हणत होता प्रत्येकाला
स्वातंत्र्य मिळावे किमान

संविधानाचे गाढे पंडीत
उभे होते तेथे महान
आपआपल्या हिशोबाने अर्थ लावून
खोलत होते आपली दुकान

अशिक्षित, असुरक्षित हातांना
म्हणाला करा मतदान
निवडून द्या तुमचा प्रतिनिधी
चालवा हा देश महान

चाळत होतो मी फाटलेले पुस्तक
शोधत होतो धडा जिवनमान
अतिशय जिर्ण अवस्थेत होते
या धड्याचे पान

विलास जैन



# ज्वारी

काव माय जुआरी (ज्वारी)
ठेवशीन का ह्या वर्षी भी
माही पोर घरी

मी भोळा शेतकरी
नाही मले नोकरी

तु देशीन तव्हाच मले
दिवाळी करता इन साजरी

गोष्टी सगळ्या खोट्या
फक्त तुच माही माय खरी

कंस, धांडे, धस, बोडं, भुशी
पाहीसन अम्हांले होते खुशी

लाणी करण्या आम्ही आतुर
तुच माह्या बैलाचे पोट भरी

पुरी झाली माही चाकरी
दे आता कंगण्या, कोठ्या
तुझ्यासन भरी

विलास जैन

# कपाशी

कपाशी व कपाशी
ठेवशीन का ह्या वर्सी भी उपाशी

फुलव आता फुल अन पाते
दाव दुनियाले तुहय माहय नाते


ठेंगनी ठूसकी बोंडांनी तू भर
पांढर सोनं दे मले मालामाल कर

फवारीसन दूर केला तुहया रोग
कष्टाचा तुले देला पुरेपूर भोग

पित्तर पाठे, गणपती, देवी, दसरा गेली दिवाळी
दुणावली, वखरली ठेवली नाही तणाची काळी

बैलानबी केली सेवा माणसं माही थकली
पाहीसन तुही उदारता मान माही झुकली

विलास जैन



# विधवा

सात जन्माची संग सोडूनी
गेला तू कोणत्या गावा,
कपाळ उजाळलं उरल्या रेघोट्या
बनली आज मी विधवा

विधी केल्या पुर्ण सगळ्या
सदैव तूच बाजूला बसावा,
आज मला कळेना का?
आवडला तूला रस्ता नवा


आज एकटी जिवनाच्या वळणावर
केव्हा मिळेल मला गारवा,
का वाटते प्रत्येक क्षणी
माझ्या समोर तू हवा

येणार नाहीस परत तू
लागणार हा घोट पचवावा
मन विटले, पाय थकले
सांग कसा मांडू डाव नवा

जमले जेव्हा तूझे माझे नाते
किती मोठा होता मेळावा,
बसली एकटी आज मी
चूक काय माझी झाली विधवा

विलास जैन





# विधुर

सजनी गेली माझी दूर
आज झालो मी विधुर,
तूच होती सुर माझा
का खेळ खेळला हा क्रुर

सप्तपदीचा हा विसर कसा
सांग माझा काय कसूर,
स्वप्नांचेचं आज उरले
दुतर्फा उफाळणारे पूर

सोबत होतो वर्षे किती
पाहण्या तुजला आज मी आतुर,
नियतीचा हा डाव कसा
झाला देव किती निष्ठूर

भेटणार तू कोणत्या जन्मा
सांग गाव तूझे किती दूर
सरले माझे जिने आता
उरली फक्त स्पदंने आणि हुरहुर

विलास जैन

# म्हातारपण



म्हातारपण पिकलेल्या आंब्यासम
मधुर आणि रसाळ असावे,
उतरत्या सूर्या ने अनुभवाचे
या दुनियेला दान द्यावे

भरपूर फळांनी बहरुन आलेल्या
वृक्षा सम या शरीराने झुकावे,
भटकलेल्या आणि थकलेल्या
वाटसरुंना त्याने आपल्या सावलीने झाकावे

मुरलेल्या आवळ्यासम
म्हातारपणाने बहुउपयोगी व्हावे,
थकलेल्या पावलांनी कित्येकांना
अनुभवाने मार्ग दाखवावे

थकलेल्या इंद्रियांची शरीराला
मुळीच गरज नसावी,
प्रगल्भ बुद्धीने समोरच्याची
वृत्ती जाणावी

झाडाने गळणाऱ्या प्रत्येक पानावर
शोक व्यक्त न करावे
पानांनी दिलेल्या सुखद क्षणाकरीता
निसर्गाचे आभार मानावे

जुन्या पिढीच्या हातून संस्काराची मशाल
नव्या पिठीच्या हाती द्यावी
तरुण पिढीला उडण्याकरीता
न डगमगणारी जमीन द्यावी

जुन्या दारुसम म्हातारपणाने महाग व्हावे
अनुभवताच याला बघणाऱ्याने भान हरपावे.

विलास जैन

NEW ERA'S SELF HELP

# हरवली आहे

शरीरातून हरवला आत्मा
मंदीरातून हरवला परमात्मा,
जिवनातून हरवले सुख
संसारात उरले फक्त दु:ख

मातेतून हरवली माया
बापातून हरवली छाया,
हृदयातून हरवली दया
विचित्र ही कलयुगाची किमया

चंद्राची हरवली शितलता
श्रृतुची हरवली विश्वसनीयता,
फुलातून हरवला सुगंध
माणुस झाला डोळे असून अंध

स्त्रीतून हरवली शालिनता
माणसातून हरवली विरता,
कर्मातून हरवली दृढता
आली आता अकाली प्रौढता

दिवसातून हरवला उजेड
रात्रीतून हरवला काळोख,
माणसातून हरवली माणुसकी
आता तरी माणसा ओळख

विलास जैन

NEW ERA'S SELF HELP

# उत्सव

बघा कशी आम्ही केली
आमच्या सर्व उत्सवाची होळी
गोंधळात ह्या रिती झाली
आमुच्या अध्यात्माची झोळी

बघा कशी ही
आम्ही मनवली दिवाळी
मिठाई सोडा नव्हती
कोणा नशिबी एक पोळी
दिवाळीच्या दिव्यांना झाकले
आम्ही फटाक्यांच्या प्रदुषणाने
कोण जाणे दृष्ट
लावली कोणत्या दुष्मनाने

नवरात्रीचा उत्सव होता
आईच्या जागरणाचा
भक्तीरसाचा गरबा खेळून
आईला मनविण्याचा
आगळ्या वेगळ्या कर्कष्य
आवाजाचा दांडिया आला
सनातून या भक्तीभाव गेला
बघा कसा हा घात झाला

लोकमान्यांनी गणपती बसविला
सर्वांना एकत्र आणण्यासाठी
भक्तीभाव हरपला देव बसला
लोकांच्या प्रतिष्ठेसाठी
ध्वनी प्रदुषणाने आणि
गुलालाने विघ्न केला
बघा कुठे हा विघ्नहर्ता हरपला

सदभावना आणि बंधुभावाचा
सण होता होळी
गुलाल खेळून साजरा
होत होता एके काळी
गेली गुलाल गेला बंधुभाव
जळला निसर्ग रंगाळला मनुष्य
न जाणे कोणी मारला
हा फक्त आवेशाचा धनुष्य

विलास जैन

# होळी

आला वसंत आली होळी
चला मिळवू एकमेकांचा संग
मनाच्या खोल टाकीत
चला साठवू शुभ भावनेचे रंग

नाही भिजवायची आम्हा
कुणाची साडी चोळी
करायची आम्हा दुर्गुणांची होळी
चला भरवू एकमेका पुरण पोळी

मंथन करु भक्त प्रल्हादाला
घेऊन जळाली होती का होलिका
होळी समोर मारुन बोंबा
शिव्या देऊ आम्ही का?

बघा किती सुंदर हा वसंत उत्सव
सृष्टीला बहार येण्याचा उत्सव
लावून तीव्र हानिकारक रंग
आम्ही करणार नाही आनंदाचा भंग

चला गुरुजनांना लावून रंगाचा टिळा
सर्व मिळूनी त्यांच्या पाया पडा
मोठ्यांचा आदर, समवयस्कांना शुभेच्छा
आणि लहानांना प्रेम देण्याचा उचलू विडा

विलास जैन

NEW ERA'S SELF HELP

# गरज नसते

अहंकाराला पाडण्याची
गरज नसते
दुर्गुण असलेल्या माणसाला
मारण्याची गरज नसते

तापट स्वभावाला दु:ख
विकत आणण्याची गरज नसते
स्वार्थी माणसाला माणुसकीची
गरज नसते

वासनांध व्यक्तीला स्वत:च्या
नजरेतून पडायची गरज नसते
हिंसाचाराला
पुण्यांची गरज नसते

शालीन स्त्रीला
सुरक्षेची गरज नसते
भ्रष्टाचारी माणसाला
सदगुणांची गरज नसते

चोर माणसाला
प्रकाशाची गरज नसते
धार्मिक माणसाला
लपण्याची गरज नसते

साधु संतांना भौतिकतेची
आणि पैशाची गरज नसते
पैसेवाल्या माणसाला पुण्यांची
आणि धर्माची गरज नसते

विलास जैन

# गरज असते

गरज असते
मित्रांनो गरज असते

शरीराला श्वासाची
गरज असते
प्रेताला ही जाळण्याची
गरज असते

महान कविलाही
कल्पनांची गरज असते
श्रेष्ठ गायकालाही
श्रोत्यांची गरज भासते

थोर राजकारण्यालाही
नमस्काराची गरज असते
महान ऋषीलाही
पाया पडण्याची गरज असते

सूर्यालाही उजाडण्याची
गरज असते
चंद्रालीही तेज दाखविण्याकरीता
अंधाराची गरज असते

सर्वांग सुंदर स्त्रीला सुद्धा
दिलफेक प्रियकराची गरज असते
पाषाणाहूनही कठिण माणसाला
लपण्यासाठी दोन बाहुंची गरज असते

दिव्याला प्रकाशासाठी
तेलाची गरज असते
दगडाला देव बनविण्यासाठी
छिनी हातोडीची गरज असते

विलास जैन

# शेतकरी

शेतकरी हा कष्टकरी
लुटतात त्याला
नोकर सरकारी
उरलेले रक्त त्याचे
पिते सावकारी

पिकवतो तो पिक अनेक
नशिबी त्याच्या फक्त भाकरी
पोटाच्या खळग्याला भरण्यासाठी
करतो दिवस-रात्र चाकरी

कष्टाचा तो वारकरी
नाही त्याला कोणती नोकरी
नाही त्याला लग्नासाठी छोकरी
वापरतात भाषा सर्वजन एकेरी

सरकारची त्याच्या प्रती बेफिकरी
धनधान्यांच्या मोबल्यात येते हातात ठिकरी
शेतीप्रधान या देशात तो कर्जबाजारी
कंबरतोड कष्ट करुनही तो झाला भिकारी

मुला बाळांची दैना भारी
कर्जाचे ओझे त्याच्या उरी
सर्व काही अवलंबून निर्सगावरी
म्हणून आत्महत्या करून जातो तो देवाघरी

विलास जैन

## प्रतीस्पर्धा


प्रतीस्पर्धेचे हे युग
जीवन नासवेल
आभार त्या परमात्म्याचे केवळ
मरतांना ही नसेल

संबंधातील कोमल भावना
प्रेमातील नाजुक संवेदना
मंदीरातील त्या प्रार्थना
कळेल प्रतीस्पर्धेत यांचे मोल ना

सद्‌भावनेचे ते बोल
हृदयाचा तो कौल
निसर्गाचा समतोल
नसेल याचे प्रतीस्पर्धेत काही मोल

माणुसकी जाईल बेमोल
केवळ शुन्याला उरेल मोल
प्रेम करणे ठरेल फोल

विलास जैन



# निरागस जीवन

गोजीरवाणे सुंदर सोज्वळ
ते जग कोठे हरवले,
निरागस ते जीवन शोधून
डोळे माझे थकले

होता एके काळी
चिमणा चिमणीचा तो संसार,
होत होता प्रभात काळी
मंदीरात घंट्यांचा झनकार

सूर्योदयाच्या आगमनासाठी घरासमोर
पडत होते रांगोळी अन सडे,
हिरकणी बाळाला पाजण्या
उतरत होती मोठे कडे

NEW ERA'S SELF HELP

वचन आपल्या राखण्या
देत होते प्राणाची आपुली आहुती,
स्वत:ला निर्दोष दाखविण्याकरीता
चालत होते अग्नीवरती

धर्म होता ह्दयात
आणि माणुसकी होती शिरी,
प्रेम होते पशु पक्ष्यांवर
प्रेम होते प्राण्यांवरी

विलास जैन

# किव

जीवन जगतांना जातो जीव
मरतांना सुद्धा जातो जीव
माणसा तुझी येते आता किव

माणसा तू ओलांडली
संस्काराची शिव,
संस्कृतीचा खुलेआम
घेतला रे तू जीव

माणुसपण तुझ्यामध्ये
शोधतांना येते नाकी नऊ,
ओळखणे कठिण तुजला
आहे तू श्री. किंवा सौ.

हिंस्त्रपणा मध्ये
सिंह तुझ्या पुढे झाला गऊ,
सुंदर सोज्वळ सौंदर्याला
तू म्हणतोस गिळू की खाऊ

नग्नतेमध्ये तू प्राण्यांना
पुढे दिले नाही जाऊ,
विसरलास तू त्या साधेपणाच्या
गोष्टी ज्यात होते चिवताई आणि काऊ

**विलास जैन**

# अपघात

अपघात बघत नाही
कधी कुणाची जात
येऊ शकतात कधीही
दिवस असो वा रात

निष्काळजीपणा किंवा दुर्गुणामुळे
होते याची सुरुवात
कधी शिक्षा देऊन सोडतात
तर कधी जीवावर बितवतात

अपघात कधीही
नशिबाने येत नसतात
अपुर्णता असते
कुठेना कुठे कर्मात

जीवन होते पूर्ण
जेव्हा अपघात शिकवतात
कोणी कोणी याला भेटून
जीवन जगणे विसरतात

अपघाता नंतर पुन्हा
नविन करायची असते सुरुवात
कर्माची आहुती देऊन
जगायचे असते दिन रात

थोडे काही हरवणे
कठिण नसते जीवनात
विश्वास स्वत:वर असणे
महत्वाचे असते अपघातात



विलास जैन

# अपराध

मनाला थकवते अपराध अपार
घटका भरही पडू देत नाही
तो याचा विसर

प्रत्येक घटनेत तो
करत असतो आवरा सावर
दुध पण काय तो
ताकही पितो मारुन फुंकर

अपराध्याला आवडतो
एकांत आणि अंधार
मनातल्या भीतीला नसतो
त्याचा काही पारावार


बेचैन होऊन करीत असतो
सदैव याचाच विचार
विसरण्यासाठी याला कुकृत्याने
करतो मनाचा उपचार

अपराध चालतात ज्या दिशेने
जेथे असतो अंधार
यापासून वाचण्याकरीता
घोटायचे असतात मनात सुविचार

अपराध्याचा संत
करु शकतात सुधार
बदलवू शकतात त्याचा
जीवनाकडे बघण्याचा विचार

विलास जैन





# प्रेमाचे बिज

चला पेरूया आज फक्त
प्रेमाचे बिज
या हृदयाने आज
करूया सर्व जग काबिज

हा गोरा तो काळा
नको वजाबाकी, व्हावी फक्त बेरीज
मान अपमानाच्या या युद्धाला
करा आता खारीज

मायेचा हात अन् मैत्रीची साथ द्यावी
बनावे लोकांच्या गळ्यातील तावीज
उधळवावी समर्पित भावनांची शब्द सुमने
विरह वेदनाची नसावी तजवीज

चंद्रासम शांत अन् शितल व्हावे
न व्हावे काळरात्रीतील कडकडणारी वीज
माळावरच्या भिरभीरनाऱ्या थंड वाऱ्यासम
अल्हाददायक स्पंदनांनी धडधडाव काळीज

विलास जैन

# सल्ला

जगात देणे सोपे
घेणे कठिण असा हा सल्ला
न मागता घेऊन घेऊन
भरला बघा माझा गल्ला

निस्वार्थपणे देत जातात
काही महामानव सल्ला
थोडी उपेक्षा करताच
चढवतात आपल्यावर हल्ला

पसरला आहे जगात
सगळीकडे सल्ल्यांचा हल्लागुल्ला
बघा कुणाकडे प्रेमाने
मग बघा तो बोल्लाच

सल्ला मिळतो फुकटात
बाजारात पॅकेटमध्ये नाही खुल्ला
मोठ्या प्रमाणात उलाढाल
बघा कसा बाजार चाल्ला

सल्ल्यावर जर सरकारने
कर कोणता ठेवला
सर्व जगात समजा देश
आपला श्रीमंत झाला

विलास जैन

# न्याय

न्याय कुणाला हवाय
कुणाला मिळालाय आणि कोणी दिलाय

गावोगावी उभी ठाकली न्यायमंदिरे
सामान्य माणूस न्यायाकरीता का गावोगावी फिरे

नव्व्याण्णऊ अपराधी सुटले तरी
एका निरअपराध्याला शिक्षा न व्हावी
सुरवातीपासूनच आम्ही भाषा
नव्व्याण्णऊ अपराध्यांना सोडण्याची करावी

न्यायालयात न्यायदेवता डोळ्यावर पट्टी लावून उभी
न्यायाच्या प्रतिक्षेत खपले किती गेले कुणी नभी

इंग्रज सोडून गेले आमच्याकरीता न्यायप्रणाली
अन्यायाचे प्रतिक म्हणून ज्यांची जगात प्रतिमा झाली

कलयुगाच्या या युगात न्यायाची अपेक्षा का करावी
वेळ निघून गेल्यावर काय कामाची न्याय प्रणाली

न्यायाच्या धंद्यात धड झाले
किती पोलिस, कायदे पंडीत अन् न्यायाधिश
जिवंत ठेवण्या कित्येकांना पुरेसे न्यायाचे आमिष

विलास जैन



# वेडा

जगावेगळा मी वेडा
कोणी म्हणतो म्हसोबा
कोणी म्हणतो रेडा

हुशारी करते माल गोळा
मग भलेच तुम्ही माणुसकी सोडा

ज्ञान खेचते ध्यान
मग असो ते कोरडे पाषाण

मान मिळतो बाजारात
किलो किलोने छान
अभिमानात वसते कुणाचे प्राण

वेडा करीतो आशिर्वाद गोळा
कामा येईल समजतो भोळा

शुभेच्छा आणि आशिर्वादाने
भरला त्याचा वाडा
देवासमोर मांडतांना बाजू
घालावा लागणार नाही त्याला कोट काळा

प्रत्येक कामानंतर हुशार वाटतो पेढा
वेडा करीतो फक्त माणूस गोळा

विलास जैन

# शरीर

का शरीराचे लाड करावे
हा तर हाडा मासाचा पुडा
होते कुजायला सुरुवात
क्षणाभरात बस प्राण तुम्ही सोडा

कित्येक कविंनी वर्णन केले
सुंदर या स्त्री शरीराचे
मद्यधुंद झाले होते ते पेले
चढवले होते त्यांनी वासनांचे

स्त्री वक्षाच्या अवती भवती
प्राण अडकले किती रसिकांचे
बाळाला दुध पाजण्या
साधन हे निसर्गाचे

स्त्री शरीराचा बाजार मांडला
आई – बहिनींनी
ग्राहक बनुन काय नविन
मिळविले या वासनांध भावांनी

वेडा झाला माणुस शोधत
आहे सुख या शरीरात
शरीर हे साधन आत्माचे
उपयोगी फक्त जीवन जगण्यात

विलास जैन

# अंधार

अंधार देत नसतो आधार
नैतिकता घ्यावी लागते यात उधार

अंधारात पापाला
का नाही पार
कारण बुद्धी झोपलेली असते
करत नाही विचार

अंधारातच चरित्राला
लागते ठोकर
जसे डोळे बंद करुन
दुध पिते मांजर

अंधारातच भिती
वाटते फार
कारण कित्येकांना यातच
माणुसकीचा पडतो विसर

अंधारातच कित्येक
नशेत होतात तर
कारण त्यांना आत्म्याला
करायचे असते सर

कमकुवत व हिंस्त्र प्राण्यांना
आवडतो अंधार
घात घालण्याकरीता करावे
लागत नाही त्यांना कष्ट अपार

विलास जैन



# विडंबना

पंख तुटलेले प्राण थकलेले
तरी जीवनाची आशा
सर्व काही हरुनसुद्धा
सुटत नाही जगण्याची अभिलाषा

मरण्यापेक्षा जगणे कठिण
काही नसतांना प्रत्येक क्षणी मरणे नविन
मनामध्ये भावना या हीन
तरी का सोडत नाही जगणे दीन

समजत नाही जगणे किंवा मरणे चांगले
का फक्त जगण्याचे डोहाळे लागले?
का फक्त जगण्यासाठी नितीमत्ता विकले?
का ईमानदारी आणि माणुसकीपुढे शरमेने डोळे झुकले?

एक क्षण जरी स्वाभिमानाने जगलो
संकटापुढे कधी न हरलो
पुरुषार्थापुढे कधी न थकलो
समजा मी खरे जीवन जगलो

विलास जैन

# आक्रोश


असे वाटते करावा उठून आक्रोश
काय सांगावे काय बोलावे
माणसा तुझ्यासाठी
उरला नाही शब्दकोष

उठता बसता भरला
फक्त भौतिकतेचा आवेश
माणसांकरीता उरली फक्त
गुंतवणूक आणि निवेष

माणुस पिसाळला
मनुष्य जीवनाचा अर्थ त्याला न कळला
पैशासाठी हिंस्त्रपणा अंगिकारला
त्यासाठी ऋणानुबंध विसरला

असे वाटते उठून
जावे कोठे तरी दूर
अश्या दुनियेत जेथे
मानवतेचा ओसरला नसेल पूर

विलास जैन



# चालणारे नाणे

स्वाभिमानी व्यक्तींना मारतात लाथा
जी हुजुराच्या पुढे ठेवतात माथा
ही आहे या जगताची गाथा
सहन होत नाही पुरे झाले देवा आता


बघणारा फक्त सांगकाम्याच बघतो
सत्ता फक्त सोम्या गोम्याच्या हातीच देतो
नाव मात्र त्याचे विश्वास ठेवतो
हे माहित असुनही की त्याने
विश्वास उसनवार आणलेला असतो

राजकारणात स्वाभिमानाचे नाव बंडखोरी ठेवतात
गधड्यांपेक्षा घोडे हे स्वस्त विकतात
मुजरा करायला जे जास्त वाकतात
तेच फक्त विश्वासु ठरतात

नेत्यांवर स्तुतीसुमने उधळतांना
जे कधी न थकतात
मग भलेच ते चालतांना धापतात
धाडस नसतांनाही जे शब्दांचे उत्तुंग डोंगर चढतात
तेच खरे चालणारे नाणे असतात

विलास जैन

NEW ERA'S SELF HELP



# श्रद्धा-अंधश्रद्धा

श्रद्धेच्या पैलतीरावर वसते अंधश्रद्धा
दोघांच्या मधे असते फक्त एक बारीक रेषा

श्रद्धेच्या देऊळात वसतो देव
अंधश्रद्धेच्या मंदिरात वसतो दानव

अंधश्रद्धा करते डोळस माणसाला अंध
श्रद्धा बनवते साधारण माणसाला संत

अंधश्रद्धा करायला लावते हिंसा
श्रद्धा मनात जागवते अहिंसा

श्रद्धा ही निर्मळ मनात वसते
अंधश्रद्धा ही घाबरट मनात असते

श्रद्धा माणसाची ढाल बनते
अंधश्रद्धा देवाला आपली ढाल बनवते

श्रद्धा माणसाला सावरते
अंधश्रद्धा जीवनात भटकवते

विलास जैन





# डर

डर तू पापाला
किंवा घाबर
खेचलेला आहे तू
तुझ्याकडे परत येणारा रबर


जिथे जिथे वाढला
आहे पापाचा वावर
निसर्गाने घातलेला
आहे त्याला आवर

बहुमूल्य मिळाले
जीवन त्याला तू सावर
कर सत्कर्म ठेव
पापकर्माचा विसर

द्वेष बुद्धी ठेऊ नको
किंवा नको तू कावर
हेच तुला पकडून
ठेवतील धर्तीवर

पुरुषार्थ कर आणि
विश्वास ठेव देवावर
कितीही पाप केलेस
तरी मिळेल तुला वेळेवर

विलास जैन



# स्वातंत्र्य

स्वातंत्र्य कुणा कुणाला मिळाले
या स्वतंत्र भारतात
मनातील असंख्य भुते
मला फिरुन फिरुन विचारतात

म्हणतात सांगा स्वातंत्र्यात कशी
माणसे राहतात आणि जगतात
स्वातंत्र्याचा आनंद घेऊन
कशी ती वागतात

कसे असते स्वातंत्र्यामधले
सरकार आणि प्रशासन
का मिळते सर्वांना चांगले
जीवन आणि आपलेपण

एकाच वेळी एवढी प्रश्ने
बघून मी घाबरलो
स्वातंत्र्यात जगतांना या गोष्टी
ना मी कधी अनुभवलो

विचार केला स्वातंत्र्याच्या
नावाखाली चालला आहे स्वैराचार
स्वातंत्र्य उरले फक्त त्यांच्याकरीता
ज्यांना करता येतो व्याभिचार

विलास जैन

# वणवा

पेटला आहे आज
समाजात भ्रष्टाचाराचा वणवा
माणसांनो आता तरी
माणुसकीच्या भावना जागवा

जो तो आज स्वार्थापायी
माजवतो आहे अनाचार
बिघडेल समाजाची घडी
थोडा तरी करा विचार

भौतिकतेच्या सुखापायी करीतो
एक दुसऱ्यावर अत्याचार
मन जेव्हा दु:खी होईल
दुसरा चालणार नाही उपाय

एका दुसऱ्याने नाही
हा वणवा विझणार
सुधरलो नाही आम्ही तर
एकही यातून नाही वाचणार

सुकले आहे समाजाचे मन
ओलावा नाही भावनेचा
सुकलेले जळते भरभर
विचार करीत नाही प्रतिष्ठेचा

वणव्यात जळण्यापेक्षा पेटवा
आज संस्काराचे दिवे
सुधरविन्या येणाऱ्या पिढीला
त्याग करायला हवे

विलास जैन

## राजयोग

राजयोगा करीता द्यावा लागत
नाही कुणा कुणाला भोग
कुणाला मिळतो सहजपणे
असतो केवळ योगा योग

असला जर नशिबात तर घ्यावा
लागत नाही कुणाचा सहयोग
दूर जावे लागत नाही सहन करावा
लागत नाही वियोग

राजयोग कुणा कुणाला मिळतो
फार महाग
अख्खे जीवन खर्चून मिळतो
फक्त याचा एक भाग


नशिबी येतो कधी कधी
त्या करीता स्वजनांचा वियोग
भगिरथ प्रयत्न करुनही
होत नाही काही उपयोग


राजयोग करतात कसा
कोणी याचा उपयोग
शरीराची खूप सेवा करतात
घेतात भौतिकतेचा भोग


सर्व काही असूनही काही करतात
सर्वांना सहयोग
ठेवतात माणुसकी, पाळतात भूतदया
यालाच म्हणावा राजयोग


विलास जैन

## आमचे मराठी व हिंदी भाषीक समाज उपयोगी साहित्य निराश व्यक्तीला प्रोत्साहीत करण्यासाठी प्रेरणात्मक सुविचार, शेरो शायरी, दोहे











**शब्दांमृत®(हिंदी)**
**जीवनाकडे बघण्याचा**
**दृष्टीकोन देणारा**
**कविता संग्रह**






**शब्दांमृत®(मराठी)**
**मराठी भाषीक**
**समाज उपयोगी साहित्य**
**निराश व्यक्तीला**
**प्रोत्साहीत करण्याकरीता**
**३९ कवितांचा संग्रह**


आमचे हिंदी भाषीक समाज उपयोगी साहित्य लहान मुलांच्या मनावर संस्कार घडविण्याकरीता २५ कवितांचा संग्रह

**नव निर्माण**® चे चार भाग



# आभार

त्या सर्वांचे जे
दुसऱ्यांसाठी चांगले आहेत...
चांगले होण्यासाठी सदैव
तत्पर आहेत...
चांगले होण्यासाठी सदैव
प्रार्थना करतात...
चांगले करण्याकरीता
भरपूर मेहनत करतात...
चांगल्या व्यक्तीची मनापासून
प्रशंसा करतात...
आणि प्रत्येक वेळी चांगल्या
कामामध्ये
तन मन धन
देण्यासाठी तयार असतात..



आपणा पासून मला प्रेरणा मिळते

**विलास जैन**

हे कार्य नाही क्रांती आहे



## माझी ओळख

मी एक ऊर्जा आहे. निरंतर वाहणारी ऊर्जा. कोणत्या लिंग, भेद, धर्म आणि आकारात आपल्या समोर उपस्थित आहे, फक्त त्यानेच माझी ओळख समजू नका. आपण माझ्या ज्या कार्यांना विकास, उत्साह, आनंद, कार्यक्षमता, आस्था, प्रोत्साहन अशा अनेक मोठ्या शब्दांनी संबोधंता ती फक्त माझ्या जीवनाची धारा आहे. मी अनेक वेळा तुमच्या जीवनात येतो आणि निघून जातो. काही वेळ तुमच्या सोबत चालतो त्याला तुम्ही माझे सहकार्य समजता. कृपया हे जाणून घ्या की आपल्यामुळेच माझे जीवनक्रमण सहज व आनंदादायी बनते. अनेक वेळा आपल्याला माझ्यामुळे जाणता किंवा न जाणता काही लाभ होत असेल, काही वस्तु प्राप्त होत असतील. कृपा करुन त्या करीता मला धन्यवाद म्हणू नका. कारण मी बनलोच त्या करीता आहे. हो, पण जर माझ्याने काही चुक झाली तर मला आपण दयाळू हृदयाने माफ कराल अशी आशा बाळगतो. तुमच्या पासून मला निरंतर जीवन जगण्याची प्रेरणा मिळते.

धन्यवाद..!

आपला विनम्र

विलास जैन

किंमत : १००/-

हे कार्य नाही क्रांती आहे